**3.3.4 Average percentage of students participating in extension activities at 3.4.3. Above during last five years**

**Annexure 4**

Sarvmat Date 21/12/2016

Page no. 3.

# विखे अभियांत्रिकीचे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर



डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाने जखणगाव येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या समारोपप्रसंगी प्रभारी प्राचार्य डॉ. के. बी. काळे, जखणगावचे सरपंच बी. आर. कर्डिले आदी.

अहमदनगर (प्रतिनिधी) - डॉ विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने ८ ते १५ डिसेंबर २०१६ या कालावधीत नगर तालुक्यातील जखणगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विशेष शिबिर पार पडले. शिबिराच्या समारोप प्रसंगी प्रभारी प्राचार्य डॉ. के. बी. काळे, जखणगावचे सरपंच बी. आर. कर्डिले उपस्थित होते.

यावेळी डॉ. के. बी. काळे म्हणाले, अभियांत्रिकी तंत्रज्ञानाचा वापर करून गावातील अनेक प्रकल्प पूर्ण करता येतील. स्मार्ट व्हिलेज म्हणून गावाचा नावलौकिक करण्यासाठी या शिबिराचा उपयोग होणार आहे. या शिबिरामधून विद्यार्थ्यांची समाजासाठी काम करण्याची प्रेरणा वाढत जाते. स्वत:साठी जगण्यापेक्षा समजासाठी जगण्याचा आनंद वेगळा असतो. त्यामुळे प्रत्येकाने समाजासाठी जगणे महत्त्वाचे आहे. सरपंच कर्डिले यांनी गावक-यांना अत्याधुनिक ज्ञानाशी सांगड घालून ग्रामविकास कसा साधता येईल हे सांगितले. शिबिरादरम्यान स्वच्छ भारत अभियान, श्रमदान, प्राथमिक शाळेसाठी नळजोडणी योजना, ग्रामीण भागातील समस्यांची ओळख, सौर ऊर्जेचे महत्त्व, अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचा वापर व इतर उपक्रम राबविण्यात आले. शिबिराच्या आयोजनासाठी कार्यक्रम अधिकारी डॉ. सुरेशकुमार हाळनोर, प्रा. स्नेहल अवझे, प्रा. एस. डी. देवखिळे, प्रा. अमित वानखेडे, प्रा. ए. डी. पाठक, प्रा. अयॉन सेनगुप्ता, प्रा. पीयूष भंडारी, प्रा. विकास खाकाळ, प्रा. रवींद्र लवांचे व प्रा. श्रुती पोफळे यांनी परिश्रम घेतले.

This News Shows the Glimpse of Valedictory function NSS Camp Organized in the Village Jakhangaon from 8th Dec to 15th 2016.

Dr. V.V. PATIL COLLEGE OF ENGINEERING Ahmednagar

PRINCIPAL
Dr. Vithalrao Vikhe Patil
College of Engineering
Ahmednagar

[redacted]

# विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून गावांचा कायपालाट

म. टा. प्रतिनिधी, नगर

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाची गावोगावी शिबिर सुरू आहेत. शिबिरामध्ये विद्यार्थी स्वयंसेवकांच्या श्रमदानातून गावातील सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता, वृक्षारोपण, महिला सक्षमीकरण असे विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात येत आहेत.

जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या न्यू लॉ कॉलेजचे एनएसएस शिबिर मौजे भोरवाडी येथे झाले. शिबिर कालावधीत स्वयंसेवकांनी मौजे भोरवाडी येथे हनुमान मंदिर परिसरामध्ये सुमारे १०० वृक्षांची लागवड केली. वृक्ष लागवडीसाठी विद्यार्थ्यांनी स्वतः खड्डे खोदले होते. हे सर्व वृक्ष विद्यार्थ्यांना ॲड. सुभाष भोर यांनी उपलब्ध करून दिली होती. यावेळी सरपंच अश्विनी वायळ, शिवाजी भोर, राजेंद्र भोर, सुनंदा भोर यांच्यासह न्यू लॉ कॉलेजच्या एनएसएस विभागाचे कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक उपस्थित होते.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय यांचे एनएसएस शिबिर हे जखणगाव (ता. नगर) येथे उत्साहात पार पडले. शिबिराचे उद्घाटन हे विखे पाटील फौंडेशनचे प्रा. सुनील कल्हापुरे व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयकुमार जयरामन यांच्या हस्ते झाले होते. याप्रसंगी उपसरपंच बी. आर. कर्डिले, डॉ. सुनिल गंधे, बाळासाहेब सहाणे, शिवाजी कर्डिले, संजय गायकवाड, मारुती भिसे, अरुण वाळके, रजनी गंधे उपस्थित होते. शिबिरामध्ये सौर ऊर्जेचे महत्त्व, गावातील पक्क्या डांबरी रस्त्याचा आराखडा, गावाची





स्वच्छता, गावातील सार्वजनिक स्वच्छतागृहे, अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांचा वापर, ई बँकिंग, स्मार्ट व्हिलेज, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. शिबिर यशस्वीतेसाठी प्रा. संजय जोशी, प्रा. सुनिल मांढरे, प्रा. गणेश डहाणे, प्रा. विकास खाकाळ, प्रा. आरती बावणे, प्रा. एस. एल. नागरे, प्रा. बी. डी. कानवडे, प्रा. एन. डी. राऊत, प्रा. प्रसाद रसाळ यांनी परिश्रम घेतले.

न्यू आर्टस्, कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेज अहमदनगर यांचे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर सारोळा कासार येथे सुरू आहे. या शिबिराचा समारोप २९ डिसेंबर रोजी होणार आहे. शिबिरामध्ये व्यक्तीमत्त्व विकास, युवकांचे आरोग्य व आहार, शेती उद्योग आणि आजचा शेतकरी, समाज परिवर्तनात युवकांची भूमिका, आनंदी जीवन जगण्याची कला, स्वयंसेवी संस्थेची उद्दीष्टे अशा विविध विषयांवर व्याख्याने झाली. विद्यार्थ्यांनी श्रमदान करून ग्रामस्वच्छता केली. तसेच जलसाक्षरता, महिला सक्षमीकरण, रस्ता सुरक्षा अभियान, वृक्षारोपण असे विविध उपक्रम राबवले. या शिबिराचा समारोप २९ डिसेंबर रोजी होणार असून शिबिर यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. बी. एच. झावरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी डॉ. बाळासाहेब सागडे, प्रा. बी. एन. मुर्तडक, प्रा. भारती दानवे परिश्रम घेत आहेत.

This News Shows the Glimpse of NSS Camp Organized in the Village Jakhangaon .

PRINCIPAL
Dr. Vithalrao Vikhe Patil
College of Engineering
Ahmednagar

# विखे फाउंडेशनच्या विद्यार्थ्यांची जखणगावात स्वच्छता

नगर | प्रतिनिधी –

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, एम.बी.ए. सेंटर आणि पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत या तीनही महाविद्यालयातील तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी हिवाळी श्रमदान शिबिरात जखणगाव (ता. नगर) येथे स्वच्छता केली.

हिवाळी श्रमदान शिबिराची सांगता महाआरोग्य शिबिराने करण्यात आली. आनंदऋषिजी नेत्रालय, डॉ. कुलकर्णी डेन्टल क्लिनिक, डॉ. गंधे हॉस्पिटल व सिव्हील हॉस्पिटलमधील आयुष विभागामार्फत मोफत महाआरोग्य शिबिर घेण्यात आले. यात सुमारे ४०० रुग्णांवर उपचार करण्यात आले तर २५ रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. वाघोळी सरपंच सविता कर्डिले, उपसरपंच मोजिब नवाब शेख, डॉ. सुनील गंधे, माजी सरपंच बबनराव कर्डिले, मुख्याध्यापक प्रा. बी. डी. बाळुंज, रमेश आग्रे यांच्यासह ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

या शिबिरात डॉ. ज्योती तनपुरे, डॉ. स्नेहल कुलकर्णी, डॉ. सौ. म्हस्के, डॉ. श्रीमती शेख, डॉ. मोहिनी जाधव, सुशीलकुमार गाडेकर, डॉ. सुनील गंधे यांनी रुग्णांची तपासणी केली. अरिष्टो फार्मा कंपनीच्यावतीने सागर ठाणगे यांनी रुग्णांची ब्लड शुगर मोफत तपासली. या शिबिरात रुग्णांवर आधुनिक वैद्यकशास्त्र, आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी, योग व निसर्गोपचार पध्दतीने उपचार करण्यात आले.

या सातदिवसीय शिबिरात विद्यार्थ्यांनी विविध अभियांत्रिकी शाखेतील अत्याधुनिक ज्ञानाचा उपयोग करुन ग्रामीण भागामध्ये सुधारणा करुन ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. तसेच सौरऊर्जेचे महत्त्व, गावातील पक्क्या डांबरी रस्त्याचा आराखडा, गावाची स्वच्छता, जनजागृती, एनर्जी ऑडीट, संगणक प्रशिक्षण, हेल्थ सर्व्हे, गावातील सार्वजनिक स्वच्छतागृहे, अपारंपरिक ऊर्जास्त्रोतांचा वापर, ई बँकींग, स्मार्ट व्हीलेज व स्वच्छता अभियान यातून गावाचा विकास कसा होईल हे विद्यार्थ्यांनी शिबिरात प्रात्यक्षिकांद्वारे ग्रामस्थांना करुन दाखविले.

या शिबिरासाठी प्रा. संजय जोशी, प्रा. अजित नांगरे, प्रा. डॉ. एम. पी. शर्मा, प्रा. अतुल निंबाळकर, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. सुनील मांढरे, प्रा. गणेश दहाणे, प्रा. बी. टी. कानवडे, प्रा. प्रसाद रसाळ, प्रा. नीळकंठ देशपांडे, प्रा. प्रतिभा गायके, ए. जी. गायकवाड यांनी परिश्रम घेतले. या शिबिरात सुमारे १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.



डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे अभियांत्रिकी महाविद्यालय, औषधनिर्माण शास्त्र, महाविद्यालय, एम. बी. ए. सेंटर आणि पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत नगर तालुक्यातील जखणगावात हिवाळी श्रमदान शिबिर विविध सामाजिक उपक्रमांनी झाले. (छाया/विजय मते)

Dr. Uday ... Principal

PRINCIPAL
Dr. Vithalrao Vikhe Patil
College of Engineering
Ahmednagar

Prof. Danane G M
(P.R.O)

To:
1. Principal
2. HOD (Civil/Mech/E&TC/Electrical/IT/Chemical/TPO)
3. Coordinator -

This News Shows the NSS Camp Organized in the Village Jakhangaon . In this Seven days Student of different branches perform various activity like cleanliness of village , energy audit, health survey and so on.

Date: 15/1/2019

Dr. ... Naik
Principal

PRINCIPAL
Dr. Vithalrao Vikhe Patil
College of Engineering
Ahmednagar

# विखे फाउंडेशनच्या एनएसएस कॅम्पची सांगता



■ डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे अभियांत्रिकी महाविद्यालय, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, एम.बी.ए. सेंटर आणि पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत नगर तालुक्यातील जखणगांवात हिवाळी श्रमदान शिबीर विविध सामाजिक उपक्रमांनी संपन्न झाले. ■ छाया : विजय मते

अहमदनगर (प्रतिनिधी) - डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, एम.बी.ए. सेंटर आणि पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत तिनही महाविद्यालयातील तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांसमवेत हिवाळी श्रमदान शिबाराचे आयोजन जखणगांव येथे नुकतेच यशस्वीरित्या पार पडले.

या सात दिवशीय शिबीरामध्ये विद्यार्थ्यांना विविध अभियांत्रिकी शाखेतील अत्याधुनिक ज्ञानाचा उपयोग करुन ग्रामीण भागामध्ये सुधारणा करुन ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. तसेच या हिवाळी शिबीरात सौर उर्जेचे महत्व, गावातील पक्क्या डांबरी रस्त्याचा आराखडा, गावाची स्वच्छता, जनजागृति, एनर्जी ऑडीट, संगणक प्रशिक्षण, हेल्थ सर्व्हे, गावातील सार्वजनिक स्वच्छतागृहे, अपारंपारिक उर्जा स्त्रोतांचा वापर, ई बँकींग, स्मार्ट व्हीलेज व स्वच्छता अभियान यातून गावाचा विकास कसा होईल हे शिबीरात विद्यार्थी त्यांच्या प्रात्यक्षिकांद्वारे करुन दाखविले.

हिवाळी श्रमदान शिबीराची सांगता महाआरोग्य शिबीराने करण्यात आली. यामध्ये आनंदऋषिजी नेत्रालय, डॉ. कुलकर्णी डेन्टल क्लिनीक, डॉ. गंधे हॉस्पिटल व सिव्हील हॉस्पिटलमधील आयुष विभागामार्फत मोफत महाआरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले. नागरिकांचा या शिबीरात उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यात सुमारे ४०० रुग्णांवर उपचार करण्यात आले व २५ रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. या शिबीरासाठी सरपंच सौ. सविता कर्डीले, उपसरपंच मोजिब नवाब शेख, डॉ. सुनिल गंधे व माजी सरपंच श्री. बबनराव कर्डीले, मुख्याध्यापक प्रा.बी.डी.वाळुंज, रमेश आग्रे व ग्रामस्थांच्या प्रमुख उपस्थिती लाभली.

शिबीराच्या शेवटच्या दिवशी आयोजीत महाआरोग्य शिबीरात डॉ. ज्योती तनपुरे, डॉ. स्नेहल कुलकर्णी, डॉ. सौ. म्हस्के व डॉ. श्रीमती शेख, डॉ. सौ.मोहिनी जाधव, श्री. सुशीलकुमार गाडेकर व डॉ. सुनिल गंधे यांनी रुग्णांची तपासणी केली. तसेच अरीष्टोफार्मा कंपनीच्या वतीने सागर ठाणगे यांनी रुग्णांची ब्लड शुगर फ्री तपासून नर्व्ह कन्डक्शन स्टडी सुध्दा मोफत करण्यात आला.

Prof. Dahane G.M
(P.R.O)

Copy To:
1. Principal
2. HOD (Civil/Mech/E&TC/Electrical/IT/Gymkhana/TPO)
3. Coordinator -

This News Shows the NSS Camp Organized in the Village Jakhangaon . In this Seven days Student of different branches perform various activity like cleanliness of village , energy audit, health survey and so on.

समाचार १८/१/२०२० वार शनिवार
पा. ३

# विखे कॉलेजच्या हिवाळी शिबिराची सांगता

नगर, ता. १८ – डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, औषध निर्माण शास्त्र महाविद्यालय, एम.बी.ए. सेंटर आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत तिनही महाविद्यालयाचे अकोळनेर येथे विशेष हिवाळी शिबीर पार पडले.

या राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. उदय नाईक व औषध निर्माण शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.वाय. पवार यांचे हस्ते झाले. श्रमदान शिबिरांमुळे गावचा विकास घडवून आणण्याची ताकद असते त्यामुळे गावातील लोकांचा सहभाग महत्वाचा असतो, असे प्रतिपादन नाईक व डॉ. पवार यांनी केले.

सात दिवसाच्या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी विविध अभियांत्रिकी शाखेतील अत्याधुनिक ज्ञानाचा उपयोग करुन ग्रामीण भागाम ध्ये सुधारणा कसे करता येईल याविषयी मार्गदर्शन केले. तसेच सौर उर्जेचे महत्व, गावातील पक्क्या डांबरी रस्त्याचा आराखडा, गावाची स्वच्छता, एनर्जी ऑडीट, वृक्षारोपण, आरोग्यविषयक जागृती, व्यसनमुक्ती, महिला सक्षमीकरण, संगणक प्रशिक्षण, हेल्थ सर्व्हे, गावातील सार्वजनिक स्वच्छतागृहे, अपारंपारिक उर्जा स्त्रोतांचा वापर, स्मार्ट व्हीलेज व स्वच्छता अभियान यातून गावाचा विकास कसा होईल, हे शिबिरातील विद्यार्थ्यांनी अकोळनेर येथील ग्रामस्थांना त्यांच्या प्रात्यक्षिकांद्वारे करुन दाखविले.

This News Shows the NSS Camp Organized in the Village Akolner . In this Seven days Student of different branches perform various activity like cleanliness of village , energy audit, health survey and so on.

PRINCIPAL
Dr. Vithalrao Vikhe Patil
College of Engineering
Ahmednagar

Dr. V.V. PATIL COLLEGE ... Ahmednagar

पुण्यनगरी १९/१/२०२० वार रविवार

पा. २



# श्रमदान शिबिरांमुळे गावाचा विकास घडविण्याची ताकद : डॉ. नाईक

अहमदनगर : श्रमदान शिबीरांमुळे गावचा विकास घडवून आणण्याची ताकद असते.त्यामुळे गावातील लोकांचा सहभाग महत्वाचा असतो.असे प्रतिपादन डॉ. उदय नाईक यांनी केले.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, औषध निर्माण शास्त्र महाविद्यालय, एम.बी.ए. सेंटर व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत तिन्ही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसमवेत विशेष हिवाळी शिबाराचे आयोजन अकोळनेर येथे नुकतेच पार पडले.



या राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबीराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. उदय नाईक व औषध निर्माण शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.वाय. पवार यांचे हस्ते करण्यात आले.

या शिबीरामध्ये विद्यार्थ्यांनी विविध अभियांत्रिकी शाखेतील अत्याधुनिक ज्ञानाचा उपयोग करुन ग्रामीण भागामध्ये सुधारणा कसे करता येईल याचे मार्गदर्शन केले. सौर उर्जेचे महत्व, गावातील पक्क्या डांबरी रस्त्याचा आराखडा, गावाची स्वच्छता, जनजागृती , एनर्जी ऑडीट, वृक्षारोपण, आरोग्यविषयक जागृती, व्यसनमुक्ती, महिला सक्षमीकरण, संगणक प्रशिक्षण, हेल्थ सर्वे, गावातील सार्वजनिक स्वच्छतागृहे, अपारंपारिक उर्जा स्त्रोतांचा वापर, स्मार्ट व्हीलेज व स्वच्छता अभियान याबाबत अकोळनेरच्या ग्रामस्थांना प्रात्यक्षिकांद्वारे करुन दाखविले.

यावेळी सरपंच सौ. सविताताई मेहेत्रे, उपसरपंच श्री. मच्छिंद्र जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या शिबीराचे आयोजन व नियोजन प्रा. संजय जोशी, प्रा. अजित नांगरे, प्रा. डॉ. एम.पी. शर्मा यांनी केले. शिबीरात १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सूत्रसंचलन प्रा. सुनिल भांडरे यांनी तर आभार प्रा. सौ प्रतिभा नायके यांनी केले.

यावेळी ह.भ.प. विलास महाराज, न्यु आर्टसचे प्राचार्य विजय जाधव, बँक ऑफ महाराष्ट्रचे मॅनेजर ओरे,सौ. भोर ताई, प्रा. निळकंठ देशपांडे, प्रा. सुनिल गांगरे, प्रा.गणेश डहाणे, प्रा. श्री. डी.कानवडे, प्रा. प्रसाद रसाळ,प्रा. प्रतिभा नायके, रवि शेलार यांनी सहकार्य केले. या शिबीरासाठी खा.डॉ. सुजय विखे पाटील, डॉ. बी. साबळे,डॉ. पी.एम.गायकवाड,प्रा. सुनिल कल्हापुरे,प्राचार्य डॉ. उदय पी. नाईक,प्राचार्य डॉ. पी.वाय. पवार,डॉ. ए.एस. इंगळे यांचे मार्गदर्शन लाभले.

यावेळी सहभागी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन राधाकृष्ण विखे पाटील यांनी कौतुक केले.

This News Shows the NSS Camp Organized in the Village Akolner . In this Seven days Student of different branches perform various activity like cleanliness of village , energy audit, health survey and so on.

PRINCIPAL
Dr. Vithalrao Vikhe Patil
College of Engineering
Ahmednagar

दैनिक पुढारी दिनांक 20/09/2020 पान क्र. ५

पुढारी 20/9/2020

पा. ५

# विखे महाविद्यालयाच्या हिवाळी शिबिराची सांगता

नगर : प्रतिनिधी

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालय, एमबीए सेंटर आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत तिन्ही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसमवेत विशेष हिवाळी शिबिराचे आयोजन अकोळनेर येथे नुकतेचपार पडले.

शिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी विविध अभियांत्रिकी शाखेतील अत्याधुनिक ज्ञानाचा उपयोग करून ग्रामीण भागामध्ये सुधारणा कसे करता येईल याचे मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. उदय नाईक, प्राचार्य डॉ. पी.वाय.पवार, सरपंच सविता मेहेत्रे, उपसरपंच मच्छिंद्र जाधव यांनी मनोगत व्यक्त केले.

या शिबिराचे आयोजन प्रा. संजय जोशी, प्रा.अजित नांगरे, प्रा. डॉ. एम.पी.शर्मा यांनी केले. या शिबिरात १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. शिबिराची सांगता सरपंच,उपसरपंच व ग्रामविकास अधिकारी यांच्या उपस्थितीत करण्यात आली. सूत्रसंचलन प्रा. सुनिल मांढरे यांनी तर आभार कार्यक्रम अधिकारी प्रतिभा गायके यांनी मानले. यावेळी विलास महाराज, न्यू आर्टस महाविद्यालयाचे प्राचार्य विजय जाधव, बँक ऑफ महाराष्ट्राचे मॅनेजर ओरे व भोर, प्रा. निळकंठ देशपांडे, प्रा. सुनिल मांढरे, प्रा.गणेश डहाणे, प्रा. बी.डी.कानवडे, प्रा. प्रसाद रसाळ व महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रतिभा गायके व रवी शेलार उपस्थित होते.

This News Shows the NSS Camp Organized in the Village Akolner. In this Seven days Student of different branches perform various activity like cleanliness of village, energy audit, health survey and so on.

PA
20/01

Dr. V.V. PATIL COLLEGE OF ENGINEERING

PRINCIPAL
Dr. Vithalrao Vikhe Patil
College of Engineering
Ahmednagar

दै. महाराष्ट्र टाइम्स वार मंगळवार
दि. 29/09/2020
पा. 3

## 'एनएसएस'चे शिबिर

नगर : डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालय, एमबीए सेंटर आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्यातर्फे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिर अकोळनेर येथे आयोजित करण्यात आले होते. सात दिवसाच्या या शिबिरामध्ये सौर ऊर्जेचे महत्त्व, गावातील पक्क्या डांबरी रस्त्याचा आराखडा, गावाची स्वच्छता, एनर्जी ऑडीट, वृक्षारोपण, स्मार्ट व्हिलेज व स्वच्छता अभियान यातून गावाचा विकास कसा होईल, याची माहिती शिबिरामध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांना प्रात्यक्षिकांद्वारे दिली.

This News Shows the NSS Camp Organized in the Village Akolner. In this Seven days Student of different branches perform various activity like cleanliness of village, energy audit, health survey and so on.

PA
21/01

PRINCIPAL
Dr. Vithalrao Vikhe Patil
College of Engineering
Ahmednagar